

गोष्टीरूप
महाभारत
भाग २
ज्ञानेश्वर म. कुलकर्णी
परी
प्रकाशन





**गोष्टीरूप महाभारत**
**भाग २**

◆ ———


© सुरक्षित


◆ ———

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ———

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ———

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ———

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ———

**किंमत :**
रुपये १३०/-




# कथा शिखंडीची

कौरव-पांडवांच्या युद्धाची जोरदार तयारी सुरू होती. पांडवांनी आपले सैन्य एकत्र करून त्यांची योग्य गटात विभागणी करायला सुरुवात केली होती. अजून काही पराक्रमी राजे पांडवांना येऊन मिळत होते. आपल्याबरोबर आपले सैन्य घेऊन येणाऱ्या राजांचे पांडव स्वागत करीत होते. आपणास त्यांनी मदत देऊ केली याबद्दल त्यांचे आभार मानत होते.

पांडवांकडे जमू लागलेले सैन्य पाहून कौरवांना त्या राजांचा राग येत होता.

दु:शासन म्हणाला, ''युद्धात या पांडवांना मदत करणाऱ्या राजाचा चांगलाच समाचार घेतला पाहिजे.''

दुर्योधन म्हणाला, ''पांडवांचे मित्र आमचे शत्रू आहेत. आम्हाला मदत करायची सोडून ते पांडवांकडे गेले आहेत.''

भीष्म म्हणाले, ''दुर्योधना, कशाला व्यर्थ चर्चा करीत आहात ? त्यांच्या मदतीला जसे काही राजे गेले तसे काही राजे आपल्या मदतीला आले आहेत.''



''पितामह, तुम्ही सेनापतीपद स्वीकारले आहे. सारे सैन्य आता तुमच्या हातात आहे.''

''दुर्योधना, मी समोर येणाऱ्या प्रत्येक वीराबरोबर पूर्ण सामर्थ्याने लढाई करीन. फक्त शिखंडीबरोबर मी लढाई करणार नाही.''

''तात, तुम्ही असे का म्हणता ?''

''कारण शिखंडी पुरुष नाही आणि मी स्त्रियांबरोबर लढाई करीत नाही.''

''शिखंडी पुरुष नाही ? हे असे आपण का म्हणता ?''

''दुर्योधना, या शिखंडीच्या पूर्वजन्माची कथा तुला ठाऊक नाही; पण मी या शिखंडीला पूर्ण ओळखले आहे.''

''कोण आहे हा शिखंडी ?''

''पूर्वजन्मी हा शिखंडी स्त्री होता. त्याचे नाव अंबा होते.''

''ही अंबा कोण ?''

''दुर्योधना शिखंडी कोण ? तो स्त्री कसा ? हे सर्व जाणून घेण्यासाठी तुला शिखंडीची कथा सुरुवातीपासून ऐकावी लागेल. पूर्वजन्मी तो अंबा होता हे मात्र नक्की.''

''तात, मला तुम्ही शिखंडीची कथा पहिल्यापासून सांगावी.''

''ठीक आहे ऐक. विचित्रवीर्यला गादीवर बसवले होते. त्याचा विवाह करावा असा आमचा विचार होता. काशीनरेश याच्या तीन कन्या अंबा, अंबिका आणि अंबालिका या होत्या. त्यांचे स्वयंवर जाहीर झाले; पण आम्हाला साधे निमंत्रण दिले नव्हते. काशी नरेशला आपला सर्वांसमोर अपमान करायचा होता. त्यावेळी मी स्वयंवरात गेलो आणि अंबा, अंबिका आणि अंबालिका या तीन कन्यांना घेऊन येऊ लागलो.''

''त्यावेळी आपणाला कोणी विरोध केला नाही ?''

''विरोध केला होता; पण मी दोन बाण सोडून सर्व राजपुत्रांचे मुकूट जमिनीवर पाडले होते. त्यामुळे ते सर्वजण घाबरले होते. त्या तीन कन्यांना मी घेऊन येत असताना शाल्व राजाने मला अडवले आणि युद्धाचे आव्हान केले. माझे आणि शाल्व राजाचे युद्ध झाले. शाल्व राजा पूर्ण पराभूत झाला आणि पळून गेला. त्यानंतर मी त्या तीन कन्यांचा विवाह विचित्रवीर्याबरोबर लावण्याचा निर्णय घेतला पण अंबाने विरोध केला. अंबा म्हणाली मी शाल्व राजाला मनापासून वरले आहे. आता मी विचित्रवीर्यबरोबर कसा विवाह करू ?''

''मग तुम्ही काय केलेत ?''

''मी तिला मुक्त केले आणि शाल्व राजाकडे पाठवले होते. त्यानंतर अंबा शाल्व राजाकडे गेली पण त्याने तिला स्वीकारले नाही. तो म्हणाला मी स्वत: पराभूत झालो आहे. आता मी तुला स्वीकारू शकत नाही. ज्याने तुला जिंकले आहे त्याच्याकडे परत जा. अंबा रागाने परत आली होती. तिने माझ्याबरोबर विवाह करायची इच्छा व्यक्त केली होती.

मी तर ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा केली होती. त्यामुळे मी अंबाला स्वीकारणे शक्य नव्हते. मी तिला ठामपणे नकार दिला. अंबा, फारच संतापली होती ती क्रोधाने म्हणाली, 'मी तुमच्या मृत्यूस कारण ठरेन. हा माझा शाप आहे.' संतापाने गेलेल्या अंबेने परशुरामाची आराधना केली. परशुराम तिला प्रसन्न झाले होते. ते माझ्याकडे आले आणि मी अंबेचे ऐकावे असे मला त्यांनी सांगितले. मी अंबेबरोबर विवाहाला नकार दिला. कारण माझी तशी प्रतिज्ञाच होती.''

''मग परशुराम संतापले असतील.''

''केवळ संतापले नाहीत. त्यांनी मला युद्धाचे आव्हान केले आणि मग माझे आणि त्यांचे युद्ध झाले. या युद्धात परशुराम घायाळ झाले. ते पराभूत झाले आणि निघून गेले होते. अंबाच्या मनात माझ्याविषयी द्वेष होता. तो आता अधिकच तीव्र झाला होता. तिने भगवान शंकराची तपश्चर्या सुरू

केली. भगवान शंकर तिला प्रसन्न झाले. त्यांनी अंबेला काय मागणे आहे असे विचारले. अंबा म्हणाली, भीष्माच्या मृत्यूस मी कारणीभूत व्हावे अशी माझी इच्छा आहे.''

''शंकरांनी तिला तसा वर दिला ?''

''होय. भगवान शंकर म्हणाले, पुढील जन्मी तू पुरुष होशील आणि भीष्मापुढे जाशील. त्यावेळी भीष्म तुला बरोबर ओळखतील आणि मग तू त्यांच्या मृत्यूस कारणीभूत होशील. दुर्योधना, ती अंबा म्हणजे दुसरी कोणी नसून आताचा शिखंडी आहे.''

''याचा अर्थ शिखंडीबरोबर तुम्ही युद्ध नाही करणार ?''

''मी तुला पहिल्यांदाच सांगितले आहे की, मी स्त्रियांबरोबर लढाई करणार नाही. शिखंडी म्हणजेच अंबा आहे. ती अंबा माझा सूड घेण्यासाठीच शिखंडीच्या रूपात माझ्यापुढे येईल.''

''पितामह, ही गोष्ट वाईट झाली.''

''दुर्योधना, यासाठीच मी तुला सांगतो की इतर कोणताही पराक्रमी वीर माझ्यापुढे आला तर मी त्यास पराभूत करू शकेन पण शिखंडी समोर आल्यावर मला शस्त्र उचलता येणार नाही.''

''पितामह, तो शिखंडी आपल्यापुढे येणार नाही याची काळजी घेतली जाईल.''

''दुर्योधना, भविष्यात काय होणार आहे हे कोणालाच कळत नाही. आपण सर्व वर्तमानाचा विचार करतो. भविष्य आपल्या हाती नाही. पराक्रमी पुरुष आपले कर्तव्य रणांगणावर दाखवतो. मी माझ्या कर्तव्यात कोठेही कमी पडणार नाही.''

''पितामह, आपल्याकडे हजारो शूरवीर आहेत. पांडवांचा पराभव करणे आपणाला कठीण जाणार नाही.''

''दुर्योधना, हे युद्ध साधे नाही. पांडव पराक्रमी आहेत. त्याच्याकडून लढणारे हजारो वीर आहेत. या युद्धात प्रचंड संहार होणार आहे. दुर्योधना युद्धाचा शेवट सुद्धा चांगला होणार नाही.''

''आमचे वीर प्राण पणाला लावतील आणि युद्ध करतील. हजारो सैनिक पांडवांवर तुटून पडतील.''

''तरीही अंतिम विजय धर्माचा होईल.''

दुर्योधनास पितामह भीष्मांचे हे बोलणे आवडले नाही; पण यावेळी तो पुढे काही बोलला नाही.

✦

## व्यासांचा उपदेश

युद्ध टाळण्याचा प्रयत्न सर्वांनीच केला होता. त्यामध्ये स्वत: श्रीकृष्णाने मध्यस्थी केली होती; परंतु दुर्योधनाने कोणाचे ऐकले नव्हते. युद्ध करण्यासाठी तो तयार झाला होता.

व्यास मुनींनी अखेरचा प्रयत्न करावयाचे ठरविले. ते धृतराष्ट्राकडे गेले. धृतराष्ट्राने त्यांचे स्वागत केले. त्यांना बसायला योग्य आसन दिले.

तो म्हणाला, ''मुनिवर, यावेळी आपण आलात हे योग्य झाले.''

''धृतराष्ट्रा, तू माझी प्रतीक्षा करीत होतास काय ?''

''ऋषिमुनींची प्रतीक्षा सर्वांनाच असते.''

''धृतराष्ट्रा, मी येथे तुला काही हिताच्या गोष्टी सांगायला आलो आहे.''

''आपला उपदेश ऐकण्यासाठी मी उत्सुक आहे.''

''धृतराष्ट्रा, युद्धात नाश होतो हे सर्वांनाच ठाऊक आहे पण या युद्धात लढणारे वीर म्हणजे एकाच वंशाचे पुत्र आहेत. या युद्धात विनाश होणार आहे तो आपल्या वीर पुत्रांचा.''

''मुनिवर, यासाठीच मी दु:खी झालो आहे.''

''धृतराष्ट्रा, तू अजून हे युद्ध टाळू शकतोस.''

''तेच तर माझे दुर्दैव आहे. मी हे युद्ध थांबवू शकत नाही.''

''तू राजा आहेस. तू मनात आणलेस तर हे करू शकशील.''

''मुनिवर, मी केवळ राजा आहे. दुर्योधनापुढे माझे काही चालत नाही. भीष्म, कृपाचार्य, द्रोण यांनी हीच गोष्ट सांगितली होती. श्रीकृष्ण सुद्धा यासाठीच दूत बनून या ठिकाणी आला होता; पण दुर्योधनाने त्यास बंदी करण्याचा प्रयत्न केला.''

व्यास मुनी हसले. ते म्हणाले, ''या मूर्खपणाला काय म्हणावे! श्रीकृष्ण म्हणजे प्रत्यक्ष नारायण आहे; पण या दुर्योधनाला ते कसे कळणार ! ज्यावेळी श्रीकृष्णाला बंदी करण्याचा प्रयत्न त्याने केला त्यावेळी तरी त्याचे डोळे उघडायला हवे होते; पण तो काही जाणून घेण्याची इच्छा करीत नाही.''

''या परिस्थितीत मी काय करावे ?''

''धृतराष्ट्र, पुत्रप्रेमाने तू आपले कर्तव्य विसरला आहेस. तुला ठामपणे निर्णय घेता का येऊ नये ? राजाचे प्रजेविषयी काय कर्तव्य असते, प्रजा समाधानी, सुखी राहावी हे राजाचे परम कर्तव्य आहे. हे युद्ध झाल्यास प्रजा सुखी होईल काय ? आपले किती वीर धारातीर्थी पडतील याची गणना करणे सुद्धा शक्य होणार नाही.''



''या दुर्योधनाने कोणाचेच ऐकायचे नाही असे ठरविले आहे.''

''मग विनाश ठरलेलाच आहे. तुझे पुत्र रणांगणावर मृत्युमुखी पडणार आहेत. नंतर शोक करण्यात काहीच अर्थ नाही.''

''भविष्यात काय घडणार आहे कळत नाही.''

''पण ते मला कळाले आहे. कौरवांचा पूर्ण नाश होणार आहे. पांडवांकडील वीर सुद्धा या युद्धात धारातीर्थी पडतील. रणभूमीवर मांसाचा चिखल होईल. रक्त वाहू लागेल. गिधाडे जमा होतील. हे सारे भयानक भविष्य आताच मला दिसू लागले आहे.''

''हे सारे घडणार असेल तर या जीवनाला काय अर्थ आहे !''

''सर्व घटना विनाशकारी घडू लागल्या आहेत. याचा अर्थ विनाश होणार आहे. पांडव लढतात ते सत्य आणि धर्मासाठी. त्यांनी मनात इतर कशाचा मोह बाळगला नाही; पण दुर्योधनाला सूड घ्यायचा आहे. सूड कधीही अनिष्टच असतो. सूडाचा परिणाम वाईटच घडतो. धृतराष्ट्रा, युद्ध कसे होईल हे तुला पाहायचे आहे काय?''

''मी कसे पाहणार ते युद्ध ? मी तर अंध आहे.''

''संजय, हा गावल्गण याचा पुत्र आहे. त्यास मी दिव्य दृष्टी देतो. तो इथं तुझ्याजवळ राहील. प्रत्यक्ष रणांगणावर चाललेल्या युद्धाची हकीकत तो तुला सांगेल. तो स्वत: हे युद्ध प्रत्यक्ष पाहू शकतो.''

''मूनिवर, आता आपल्याच पुत्रांचा नाश समोर दिसत आहे. मी काय करावे ?''

''धृतराष्ट्रा, तू युद्ध थांबवले नाहीस. आता कुलाच्या विनाशाची प्रतीक्षा करण्याशिवाय दुसरे काय करणार तू ?''

व्यासमुनी निरोप घेऊन निघून गेले होते.

✦

# कुरुक्षेत्र

कुरुक्षेत्र आज सैन्याने फुलून गेले होते. पांडव आणि त्यांना मदत करणारे राज आपल्या सैन्यासह तेथे दाखल झाले होते. पांडवांचे सैन्य कुरुक्षेत्राच्या पश्चिम भागात होते. त्यांचे तोंड पूर्वेस होते. त्यांच्यापुढे कौरवांचे सैन्य उभे होते. सागराच्या अफाट पाण्याप्रमाणे सैन्य पसरलेले होते.

सैन्याला मागच्या बाजूला वेगळी शिबिरे होती. या शिबिरात सैन्याची सर्व व्यवस्था करण्यात आली होती. त्यांचे भोजन, त्यांना झोपण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

कौरवांनी सुद्धा आपल्या सैन्याची व्यवस्था चोख ठेवली होती. सैन्याच्या लहान लहान तुकड्या तयार करण्यात आल्या होत्या. हत्ती, घोडे यांची व्यवस्था पद्धतशीरपणे ठेवण्यात आली होती. युद्धात वापरली जाणारी वाहने वेगवेगळ्या ठिकाणी उभी करून ठेवण्यात आली होती.

युद्धाचे शंख फुंकले गेले. श्रीकृष्णाने त्याचा देवदत्त नावाचा शंख फुंकला. अर्जुनाने त्याचा पांचवेळा शंख फुंकला होता. या शंखध्वनीमुळे कुरुक्षेत्रात हालचाल निर्माण झाली होती.

युद्धाचे नियम दोन्ही पक्षांना समजावून सांगण्यात आले होते. हे युद्ध या नियमानुसारच करावयाचे होते. हे युद्ध सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत होणार होते. इतर वेळी सर्व सैनिकांनी आपले वर्तन सामान्य ठेवायचे होते. इतर वेळी त्यांना एकमेकांवर शस्त्र उगारता येणार नव्हते.

युद्धामध्ये लढाई करताना आपल्या बरोबरीच्या वीराचा विचार व्हावा. शक्तिमान योद्ध्याने कमी शक्तीच्या सैनिकाबरोबर लढाई करू नये, एखादा सैनिक शरण आला असेल तर त्याच्यावर शस्त्र उगारू नये. त्यास ठार मारू नये. त्याचप्रमाणे घाबरून पळून जाणाऱ्याला ठार मारू नये. एखाद्याच्या हाती शस्त्र नसेल तर त्याच्यावर शस्त्र घेऊन हल्ला करू नये.

सारथी किंवा युद्धात शस्त्रे पुरवणारे आणि रक्षक पुरवणारे जे असतात त्यांना मारू नये. युद्धधर्म पाळून युद्ध केले जावे. अशा प्रकारचे अनेक युद्धनियम दोन्हीकडील सैन्याला समजावून सांगण्यात आले होते.

धृतराष्ट्राजवळ संजय उभा होता.

धृतराष्ट्र म्हणाला, ''हे संजया, तुला दिव्य दृष्टीचा लाभ झाला आहे काय ?''

''होय महाराज. मूनि व्यास यांनी मला दिव्य दृष्टी दिली आहे. त्यामुळे मी सर्व पाहू शकतो. दूर होणाऱ्या घडामोडी मी पाहू शकतो.''

''तू कुरुक्षेत्र पाहू शकतोस काय ?''

''होय महाराज, मी कुरुक्षेत्र पाहू शकतो.''

''जी भूमी मिळवण्यासाठी हे युद्ध होणार आहे त्या भूमीचे वर्णन मला सांग.''

''महाराज, ही भूमी पवित्र आहे. या भूमीत अनेक नद्या वाहत आहेत. या भूमीत अनेक नगरे आहेत. अनेक वृक्ष आहेत. पूर्व – पश्चिम पसरलेले अनेक पर्वत आहेत. या भूमीत गंगा उगम पावते. येथे हिमकूट पर्वत आहे म्हणजेच कैलास पर्वत आहे. गंगा, सिंधू, सरस्वती अशा नद्या भूमीत उगम पावतात. ही भूमी समृद्ध आहे. या भूमीत वीर, पराक्रमी पुरुष आहेत. पुण्यवान लोक आहेत. येथील लोक कुलीन आहेत.''

धृतराष्ट्र म्हणाला, ''संजया, भारतवर्षाचे वर्णन मला ऐकायला खूप आवडते.''

''सर्वांनाच ही पवित्र भूमी आवडण्यासारखी आहे. या भूमीत महान पर्वत आहेत. नर्मदा, गोदावरी, यमुना, चंद्रभागा, कृष्णा, शरावती, प्रवरा, भीमा, अशा अनेक पवित्र नद्या आहेत.''

''भरत खंडातील देश कोणते आहेत ?''

''आपण राहतो तो कुरुपांचाल देश होय. याशिवाय या भूमीत माद्रेय, शाल्व, शूरसेन, जांजल, कलिंग, पुसिंद, माल, मत्स्य, भोज, सिंधू, पांचाल, धरंधर, जठर, विदर्भ, गोपराष्ट्र, चक्र, शक, आंध्र, मगध असे अनेक प्रदेश आहेत.''

धृतराष्ट्र संजयने सांगितलेल्या वर्णनाने थक्क होऊन गेला होता. तो काही काळ शांत बसला होता.

धृतराष्ट्राने संजयला पुन्हा विचारले, ''संजय, मला तू सांग – या दिव्य दृष्टीचा तुला कोणता लाभ झाला ? त्यामुळे तू काय काय पाहू शकतोस ?''

''मुनी व्यास यांनी मला दिव्य दृष्टी दिली आहे. त्यांना मी वंदन करतो. या दृष्टीमुळे मला खूप दूरचे दिसू लागले आहे. एखाद्याच्या मनातील गोष्ट समजते. भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ समजू शकतो. एखाद्याच्या मनातले कळू शकते.''

''मग तू युद्ध जवळून पाहू शकशील ?''

''होय. मी युद्धभूमीवर विहार करू शकतो.''

''मग आता रणभूमीवर काय काय चालले आहे ते सांग.''

''कौरव आणि पांडवांचे सैन्य एकमेकांसमोर उभे राहिले आहे. सैन्याचा अफाट सागरच जणू तेथे दिसत आहे.''

''दुर्योधन काय करीत आहे ?''

''त्यालासुद्धा युद्धाची घाई आहे. तो आपल्या सैन्यात उभा आहे. प्रमुख वीरांना सूचना देत आहे.''

''एवढ्या काय सूचना देत आहे तो ?''

''दुर्योधन, पितामह भीष्म यांचे रक्षण करण्याबाबत आपल्या वीरांना सांगत आहे.'' पितामह भीष्म आपला प्रमुख आधार आहे. त्यांचे रक्षण करण्याबाबत तो वीरांना सांगत आहे. शिखंडीला पितामह भीष्म यांच्यापुढे येऊ देऊ नका. पितामह भीष्म इतर कोणाही वीरापुढे कमी पडणार नाहीत. त्यांच्या पराक्रमाने मोठे मोठे वीर रणभूमीवर पडतील.''

''आणखी रणभूमीवर काय घडत आहे ?''

''दोन्हीकडील राजे आपल्या सैनिकांना एकत्र करून त्यांच्याबरोबर महत्त्वाची चर्चा करीत आहेत. सैन्याची लहान लहान तुकड्यांमध्ये विभागणी केली आहे; परंतु या तुकड्या जवळ जवळ आहेत. राजे आपल्या सैन्याला लढाईसंबंधी आदेश देत आहेत.''

''या रणभूमीवर कौरव कसे दिसत आहेत?''

''सर्व कौरव युद्धासाठी उतावीळ झाले आहेत. युद्धभूमीवर शंखाचे आवाज येत आहेत. घोड्यांचे खिदळणे ऐकू येत आहे. रथाचे आवाज येत आहेत. वीर ओरडत आहेत. हत्तीचे चित्कार ऐकू येत आहेत. एकंदरीत युद्धभूमीवर मोठी धावपळ उडाली आहे.''



''पांडवांचे सैन्य काय करत आहे ?''

''पांडव युद्धासाठी सज्ज झाले आहेत. धर्म अर्जुनाला कसे लढावे याबाबत सांगत आहे. एका एका पांडवाला तो त्यांची भूमिका समजावून देत आहे.''

''भीम काय करतो आहे ?''

''भीम गदा घेऊन उभा आहे. तो युद्धासाठी उतावीळ झाला आहे. त्याच्या मनातील संताप त्याच्या चेहऱ्यावर दिसतो आहे.''

''नकुल-सहदेव कुठे आहेत ?''

''ते दोघे धर्मराजाने दिलेला उपदेश ऐकत आहेत. ते वीर युद्धासाठी सज्ज झाले आहेत.''

''अर्जुन काय करतो आहे ?''

''अर्जुन युद्धाची तयारी करतो आहे. तो एक व्यूहरचना करीत आहे.''

''तो कोणता व्यूह रचत आहे ?''

''तो इंद्राने दिलेला वज्रव्यूह रचतो आहे.''

''कसा आहे त्याचा व्यूह ?''

''या व्यूहामध्ये सर्वात पुढे भीम आहे. त्यानंतर धृष्टद्युम्न, नकुल, सहेदव,धृष्टकेतू हे वीर आहेत. त्या सर्वांमागे राजा विराट आहे. विराट राजाचे बंधू आणि पुत्र सुद्धा तेथे आहेत. त्यांच्याबरोबर शिखंडी आहे. शिखंडी हसत आहे.''

''मला तर या शिखंडीचा राग येतो आहे. युद्धभूमीवर हसण्याचे कारण की तो काहीतरी अनिष्ट घडवेल असे वाटत आहे.''

''शिखंडी पुढे उभा आहे आणि त्याच्या मागे अर्जुन उभा आहे.''

''अर्जुनापुढे शिखंडी कशासाठी उभा आहे ?''

''हे सर्व आता काळच ठरवेल.''

''अर्जुनाबरोबर आणि कोण आहे ?''

''अर्जुनाबरोबर कैकय बंधू आहेत. शिवाय पांचाल राजे आहेत.''

''युधिष्ठिर कोठे आहे ?''

''तो मध्यभागी उभा आहे. तो वीरांना महत्त्वाचे आदेश देत आहे.''

''पांडवाचा हा वज्रव्यूह आहे तरी कसा ?''

''हा व्यूह भयंकर दिसत आहे. या व्यूहाची रचना मोठ्या मोठ्या वृक्षांसारखी आहे.''

''आपल्या कौरवांनी कोणती युद्धनीती तयार केली आहे ?''

''कौरवांकडे हजारो हत्ती आहेत. त्यामागे रथ आहेत. त्यामागे घोडेस्वार आहेत. त्यामागे धनुर्धारी सैन्य आहे. सागराप्रमाणे अफाट सैन्य आहे कौरवांचे.''

''कौरव कोणता व्यूह रचणार आहेत ?''

''भीष्मांनी अभेद्य नावाचा व्यूह रचला आहे. हा व्यूह मोठा परिणामकारक ठरतो आहे.''

''असे तुला का वाटते ?''

''कारण ही व्यूहरचना पाहून युधिष्ठिर चलबिचल झाल्यासारखा दिसतो आहे.''

''पण अर्जुनाला काय वाटते आहे ? ''

''अर्जुन निर्भयपणे उभा आहे. तो श्रीकृष्णाबरोबर चर्चा करीत आहे.''